(१३४-१५९)

(8)

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे-१. यांचे कार्यालय
-8 SEP 2003
3354
आवक नोंदवही क्रमांक

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक: व्हीएलएस १००३/(५५७/२००३)/प्राशि-३
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :०७ ऑगस्ट, २००३.

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
नाशिक/ पुणे / कोल्हापूर/
अमरावती /नागपूर/ औरंगाबाद,

**विषय : सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी व उर्दू माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देणेबाबत**

नविन प्राथमिक शाळेस परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन सोबत जोडलेल्या यादीतील ५८ शैक्षणिक संस्थांना तिच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून इंग्रजी व उर्दू माध्यमाच्या सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली च्या वर्गाला (प्रत्येकी एक तुकडीस) कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास जून २००३ पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर परवानगी शासनपत्र क्रमांक : व्हीएलएस १०००/(५५७/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक १६ सप्टेंबर, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तींवर देण्यात येत आहे. परवानगी देण्यापूर्वी सदर संस्थेकडून रु.२०/- एवढया रकमेच्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायम विना अनुदान तत्वावर प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यात कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही, असे हमी पत्र संस्थेकडून प्रथम लिहून घ्यावे. सदरहू हमीपत्र आपल्या कार्यालयातील संबंधीत नस्तीवर कायम स्वरुपी जतन करुन ठेवावे व त्याच्या प्रती प्राथमिक शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात याव्यात. त्याची प्रत शासनासही माहितीस्तव सादर करावी.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, तसेच शासनपत्र क्र.व्हीएलएस १०००/(५५७/२०००)(१)/प्राशि-३, दिनांक १६ सप्टेंबर, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

प्राथ

Vidya Pratishthan's English Medium School, Bhigwan 413105, Tal. Indapur (M.S.)

४. प्राथमिक शाळेस शासन परवानगीचे आदेश कळविण्यापूर्वी ज्या ठिकाणी शाळेला परवानगी द्यावयाची आहे त्या ठिकाणी निवडणूक आचारसंहिता लागू आहे किंवा कसे याबाबतची माहिती विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संबंधित जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हाधिकारी यांचेकडून घेऊन त्याची खात्री करुन मगच परवानगीचे आदेश संबंधित संस्थेस कळविण्यात यावेत. तसेच सोबतच्या यादीतील संस्थेस तिच्या नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी नवीन प्राथमिक शाळा सुरु करण्यांस यापूर्वी परवानगी देण्यांत आली असल्यांस प्रथम मान्यता देण्यापूर्वी ही बाब शासनाच्या निदर्शनास आणावी. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

( सु.ह.उमराणीकर )
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत :- माहिती व तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित
१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, ठाणे/पुणे/जालना/धुळे/सातारा/अहमदनगर/बीड/अकोला/रायगड/औरंगाबाद.
३) मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक / निवड नस्ती- प्राशि-३

Vidya Pratishthan's English Medium School
Bhigwan 413105
Tal. Indapur (M.S.)

## जिल्हा धुळे

शासन पत्र क्रमांक- व्हिएलएस १००३/(५५७/०३)/प्राशि-३, दिनांक : [illegible] ऑगस्ट,२००३ चे सहपत्र

२००३-२००४ या शैक्षणिक वर्षात कायम विना अनुदान तत्त्वावर इंग्रजी माध्यमाच्या परवानगी दिलेल्या प्राथमिक शाळांची नांवे

| अ. क्र | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रामोद्योग विचार मंच, धुळे | कै. पूनमचंद मूनोतनगर, पारोळा रोड,धुळे | इंग्रजी | १ ली |
| २ | श्री. कन्हैयालाल शैक्षणिक व सांस्कृतिक मंडळ, सामोडे, तालुका-साक्री,जिल्हा-धुळे | साक्री, जिल्हा-धुळे | इंग्रजी | १ ली |

एकूण २ ( दोन ) प्राथमिक शाळा

English Medium School
Tal.Indapur (M.S.)

# जिल्हा सातारा

शासन पत्र क्रमांक- व्हिएलएस १००३/(५५७/०३)/प्राशि-३, दिनांक : ७ ऑगस्ट,२००३ चे सहपत्र

२००३-२००४ या शैक्षणिक वर्षात कायम विना अनुदान तत्त्वावर इंग्रजी माध्यमाच्या परवानगी दिलेल्या प्राथमिक शाळांची नांवे

| अ. क्र | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | गंगाई एज्युकेशन ॲन्ड सोशल वेलफेअर सोसायटी, सिद्धार्थनगर, पांचगणी | पांचगणी, जिल्हा-सातारा | इंग्रजी | १ ली |
| २ | रोटरी शिक्षण संस्था, मलकापूर, ता. कराड | मलकापूर, ता. कराड | इंग्रजी | १ ली |
| ३ | पाटण एज्युकेशन सोसायटी, पाटण | पाटण, जिल्हा-सातारा | इंग्रजी | १ ली |

एकूण ३ ( तीन ) प्राथमिक शाळा

# जिल्हा पुणे

शासन पत्र क्रमांक: व्हीएलएस १००३/(५५७/०३)/प्राशि-३, दिनांक ७ ऑगस्ट, २००३ चे सहपत्र

सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्त्वावर इंग्रजी माध्यमाच्या परवानगी दिलेल्या प्राथमिक शाळांची यादी.

| अ.क्र | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | शिक्षण मंडळ, पिं-चिं. म.न.पा. पुणे | तपोवन मंदिराजवळ, पिंपरी वाघेरे | इंग्रजी | १ ली 934 |
| २ | श्री स्वामी समर्थ ज्ञानपीठ, १४०/२ वारजे माळवाडी, पुणे | वारजे माळवाडी, पुणे | इंग्रजी | १ ली 935 |
| ३ | कै.नारायणरावचौंधे शिक्षण संस्था, पिंपळे नीलख, पुणे | विशालनगर, पिंपळे नीलख, पुणे | इंग्रजी | १ ली 936 |
| ४ | मातृ एज्यु.सोसा.सर्व्हे नं.१२२, श्री दत्तनगर, वाल्हेकर वाडी, चिंचवड, पुणे | वाल्हेकर वाडी, चिंचवड, पुणे | इंग्रजी | १ ली 937 |
| ५ | विश्वविवेक फाऊंडेशन, औंध रोड, खडकी, पुणे, ५०२, लेबॉनी टॉवर्स, | पिंपरी, पुणे | इंग्रजी | १ ली 938 |
| ६ | विद्या प्रतिष्ठान, विद्यानगरी, बारामती, जि. पुणे | भिगवण, जि. पुणे | इंग्रजी | १ ली 939 |
| ७ | श्री ज्ञान बालविकास शिक्षण संस्था सर्व्हे नं. ४५१, क्रांतीनगर, पिंपळे नीलख, औंध कॅम्प, पुणे | औंध कॅम्प,जि.पुणे. | इंग्रजी | १ ली 940 |
| ८ | जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, २१/२, सावंत प्लाझा, बालाजीनगर धनकवडी, पुणे | धनकवडी, पुणे. | इंग्रजी | १ ली 941 |
| ९ | मेजर सर्व दमनसिंग फौडेशन, आश्रय, सुविद्या पार्क-२, सीएमई रोड, भोसरी, पुणे | भोसरी (गव्हाणे वस्ती) जि.पुणे | इंग्रजी | १ ली 942 |

एकूण ९ (नऊ) प्राथमिक शाळा

Vidya Pratishthan's English Medium School, Bhigwan, Tal. Indapur (M.S.)